**Career Guidance Seminar**

***Insights for BBA and BCA Students***

**Organizer:** Sakal
**Date:** [01/09/2024]

**Speakers:**

- Mr. Vivek Velankar, Senior Career Counsellor
- Dr. Shital Kumar Ranandale, Dean Placements PCET-Nutan & President, Maharashtra Association of TPOs (MaTPo)
- Prof. Dr. H. U. Tiwari, Principal, PCCOER
- Dr. Smriti Pathak, Principal, PCACS Ravet, Pune

**Objective:**
The seminar aimed to provide career guidance and insight for students pursuing Bachelor of Business Administration (BBA) and Bachelor of Computer Applications (BCA). This event was designed to help students make informed decisions about their future careers by outlining potential career paths, required skills, and additional recommendations for each field.

Our speakers emphasized the need for students to adapt their study techniques to the evolving formats of competitive exams, highlighting the importance of staying updated with changing exam patterns and maintaining a dedicated approach to preparation. They stressed that early preparation is crucial, recommending starting well in advance, solving previous years' question papers, and focusing on developing competitive skills. Additionally, guidance was provided on selecting appropriate undergraduate subjects aligned with career goals and detailed various entrance exams and career paths to ensure students are well-informed. Effective strategies for planning and preparing for entrance exams were discussed, including structuring study schedules, managing time, and engaging in regular practice to enhance problem-solving skills. The speakers also elaborated on the admission process for BCA and BBA programs, detailing application procedures, deadlines, and fee structures, which offered students a comprehensive understanding of the financial aspects involved.

The seminar was successfully completed with active students and their parent’s participation and engaging presentations from esteemed guests, providing comprehensive guidance that equipped students with essential knowledge and

strategies for navigating their career paths. We extend our heartfelt gratitude to the distinguished guests and industry experts for generously sharing their time and insights, which significantly contributed to the seminar's success and clarified students' future career options. We also appreciate the organizing (**sakal group**) and our staff for their meticulous planning and execution, ensuring the event ran smoothly and met its objectives. Overall, the seminar proved highly beneficial for BBA and BCA students by offering clear guidance on postgraduate exam preparation and career planning. By combining insights on adapting study techniques, selecting suitable undergraduate subjects, and understanding admission processes, it provided students with a valuable toolkit to achieve their career goals.






What is Career &
How to choose career??
What is Career ??
Around 40-50 years of work with Satisf
Passion
(Work Hard for next 4 years & Enjo
(But if you Enjoy for 4 years, then y
Hard for 40 years)
WHAT YOU LOVE
WHAT YOU'RE GOOD AT
WHAT PAYS WELL









एस.बी. पाटील स्कुल, रावेत : 'सकाळ विद्या' व पिंपरी-चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड रिसर्च यांच्यावतीने आयोजित 'बारावीनंतरचे करिअर' या चर्चासत्राला उपस्थित विद्यार्थी व पालक.



रावेत : 'बारावीनंतरचे करिअर' या चर्चासत्राप्रसंगी (डावीकडून) डॉ. स्मृती पाठक, विवेक वेलणकर, डॉ. शीतलकुमार रवंदळे आणि डॉ हरिश तिवारी.

# पदवीबरोबरच पदव्युत्तर प्रवेश परीक्षांची तयारी करा

## मार्गदर्शक वेलणकर यांचा सल्ला : सकाळ विद्या सेमिनारमध्ये मिळाली करिअरची दिशा


सकाळ Vidya Organized by
In Association with
अधिक माहितीसाठी संपर्क : सचिन : 9730959699


पिंपरी, ता. १ : "चांगले करिअर करायचे असेल; तर पदवीला प्रवेश घेतल्यानंतर लगेचच पदव्युत्तर शिक्षणासाठी आवश्यक प्रवेश परीक्षांची तयारी करणे गरजेचे आहे. त्यामुळे, बीबीए, बीसीए, बी.कॉम सारख्या अभ्यासक्रमांना प्रवेश घेतल्यावरच पुढे काय करायचे ? हे ठरवावे," असा सल्ला ज्येष्ठ करिअर मार्गदर्शक विवेक वेलणकर यांनी रविवारी (ता.१) विद्यार्थ्यांना दिला.

'सकाळ विद्या' व पिंपरी-चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड रिसर्च यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'बारावीनंतरचे करिअर' या विषयावर मार्गदर्शनपर चर्चासत्रात ते बोलत होते. रावेत येथील एस. बी. पाटील पब्लिक स्कूलमध्ये हे चर्चासत्र झाले. पीसीईटीचे प्लेसमेंट अधिष्ठाता डॉ. शीतलकुमार रवंदळे, पीसीसीओई ॲण्ड रिसर्चचे प्राचार्य व वैज्ञानिक डॉ. हरीश तिवारी व बीबीए, बीसीएच्या विभाग प्रमुख डॉ. स्मृती पाठक यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. एमबीए, लॉ, मास कम्युनिकेशन या क्षेत्रांतील अभ्यासक्रम व त्यांच्या प्रवेश प्रक्रियांची माहिती देऊन वेलणकर म्हणाले, "या पदवी घेतल्यानंतर कोणत्याही पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घ्यायचा असेल; तर बुद्धिमत्ता कसोटी, इंग्रजीवर प्रभुत्व, गणित, सामान्य ज्ञान या चार विषयांचा अभ्यास करा. या विषयांचे वेळ लावून शंभरपेक्षा अधिक पेपर सोडवावे लागतील. एमबीएला मिळणारे चांगले महाविद्यालय हे पुढील चांगल्या करिअरची पहिली पायरी ठरेल. त्यासाठी पदवीला प्रवेश घेतल्यापासूनच तयारी करा. देशभरातील नामांकित महाविद्यालये पुण्यात आहेत. त्यातील अनेक महाविद्यालयांत प्रवेश परीक्षेनंतर ग्रुप डिस्कशन व मुलाखत द्यावी लागते. त्यासाठी देखील या तीन वर्षांत तयारी करा."

### आवड व कल लक्षात घ्या

आजकाल आपल्या मुलांच्या करिअरची पालकांना जास्त काळजी असते. मात्र, आपल्या मुलांचे करिअर निवडताना त्यांची आवड व कौशल्य जाणून घ्या, असे आवाहन पीसीईटीचे प्लेसमेंट अधिष्ठाता डॉ. शीतलकुमार रवंदळे यांनी केले. करिअर कसे निवडावे ? या विषयावर त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले, "कोणतेही क्षेत्र निवडताना त्या क्षेत्राला मनुष्यबळाची किती गरज आहे ? त्या क्षेत्राचे महत्त्व व किती नोकऱ्या उपलब्ध आहेत ? याची माहिती घ्या. अभियांत्रिकीला प्रवेश घेतल्यानंतर तिसऱ्या वर्षापर्यंत एक किंवा दोन इंटर्नशिप करा. त्यामुळे, कंपनीच्या प्रोजेक्टवर काम करण्याचा अनुभव मिळतो. इंटर्नशिप नंतर त्याच कंपनीत नोकरी मिळणे सोपे जाते. सध्या अनेक कंपन्यांकडून बीसीए, एमसीए या पदवी घेणाऱ्या विद्यार्थ्यांनाही अभियांत्रिकीप्रमाणेच नोकरी दिली जाते. अभियांत्रिकीच्या तिसऱ्या वर्षानंतर अनेक कंपन्या कॅम्पस मुलाखतीसाठी येतात. तोपर्यंत ॲप्टिट्यूड टेस्ट, ग्रुप डिस्कशन, प्रत्यक्ष मुलाखत, एचआर राऊंड या सगळ्यांसाठी तयारी करणे गरजेचे आहे.

पीसीसीओई ॲण्ड रिसर्चचे प्राचार्य व वैज्ञानिक डॉ. हरीश तिवारी यांनी पिंपरी-चिंचवड कॉलेज ऑफ पॉलिटेक्निक येथे विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असणारे अभ्यासक्रम तसेच नव्याने सुरू करण्यात आलेले अभ्यासक्रम याविषयी माहिती दिली. पीसीसीओईच्या शैक्षणिक संकुलामध्ये असणाऱ्या विविध शैक्षणिक सुविधा, अभ्यासक्रम, प्रवेशाचे अर्ज भरताना घ्यावयाची काळजी यावर त्यांनी मार्गदर्शन केले.

### प्रवेश परीक्षांच्या तयारीबद्दल मार्गदर्शन

चर्चासत्राचा शेवट बीबीए, बीसीएच्या विभाग प्रमुख डॉ. स्मृती पाठक यांच्या मार्गदर्शनाने झाला. बीबीए, बीसीए हे अभ्यासक्रम अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अंतर्गत आल्याने (एआयसीटीई) यावर्षी पहिल्यांदाच प्रवेश परीक्षा घेण्यात आल्या. या प्रवेश परीक्षांसाठी तयारी कशी करायची? आता सीईटीचे निकाल आल्यानंतर महाविद्यालये कशी निवडायची?, पसंती क्रमांक कसे द्यायचे? याची माहिती त्यांनी विद्यार्थ्यांना दिली. बीबीए, बीसीए करताना कोणत्या परीक्षांची तयारी करू शकतो? व्यक्तिमत्त्व विकासासाठी काय करणे गरजेचे आहे? याचीही त्यांनी माहिती दिली.